# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २७२/२०२४ दिनांक:- २५/०७/२०२४.

## "रात्रीच्या वेळी घरात घुसुन मोबाईल चोरी करणाऱ्या व मोटारसायकल चोरी करणाऱ्या सराईत आरोपीत यास अटक करण्यास माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश"

----००----

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ०८/०७/२०२४ रोजी ०१.३० ते ०२.३० वा.चे दरम्यान शॉप नं. बी/२, मिस्त्रीनगर, साई नगर, वसई पश्चिम, जि. पालघर येथे यातील फिर्यादी यांचे शॉपपमध्ये अज्ञात चोरटयाने प्रवेश करुन एक ओप्पो कंपनीचा मोबाईल व रोख रक्कम असा एकुण ५४,०००/- मुद्देमाल चोरी केलेबाबत तक्रारदार नामे श्री. अदिल रशिद खान, वय ३७ वर्षे, रा. रुम नं. बी/०२, ०५ शांता स्मृती, साई नगर, वसई पश्चिम, जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. २३५/२०२४ कलम ३०५ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेणेकामी मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत याचा तांत्रिक विश्लेषण, सी.सी.टी.व्ही फुटेज व गुप्त बातमीदार यांचे मदतीने आरोपीत नामे १) आनंद शंकर हिवराळे, वय १९ वर्षे, रा. रुम नं. ३, पांडे नगर चाळ, आर.एम. पाल शाळेच्या बाजुला, आचोळे डोंगरी, नालासोपारा पुर्व, जि. पालघर, २) संदिप श्रीराम गुप्ता, वय १९ वर्षे, रा. रुम नं. ३, ओम शांती नगर चाळ, लसाविर नगर, संतोषभुवन, नालासोपारा पुर्व, जि. पालघर यांचा शोध घेवुन त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपीत यांचेकडे तपास करता दोन्ही आरोपीत यांनी वसई परिसरात अशा प्रकारे अनेक ठिकाणी मोबाईल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली देवुन आरोपीत यांचेकडुन एकुण अं.किं.रु ९३,९९९/- किंमतीचे ०९ मोबाईल, रोख रक्कम व अं.किं.रु. ५०,०००/- दोन मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या आहे.

**आरोपीत यांचेकडुन उघडकीस आणलेले गुन्हे :-**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. २३५/२०२४ कलम ३०५ भा.न्या.सं |
| २. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. २३९/२०२४ कलम ३०५ भा.न्या.सं |
| ३. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. २४९/२०२४ कलम ३०५ भा.न्या.सं |

| | | |
|---|---|---|
| ४. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. २५१/२०२४ कलम ३०५ भा.न्या.सं |
| ५. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. २०/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. |
| ६. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. ७२/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. |
| ७. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. ८७/२०२४ कलम ३८० भा.दं.वि. |

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले/श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, श्री. नवनाथ घोगरे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई, श्री. राजु माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संतोष चौधरी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि. सनिल पाटील, पो.ह. शैलेश पाटील, पो.ह. शामेश चंदनशिवे, पो.ह. धनंजय चौधरी, पो.शि. गोविंद लवटे, पो.शि. आनंदा गडदे, पो.शि. प्रविण कांदे, म.पो.शि. पुजा कांबळे व पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ ०२ चे पो.ह. भालचंद्र बागुल, पो.शि. अमोल बर्डे, पो.शि. मोहन खंडवी यांनी यशस्विरीत्या पार पाडली आहे.

--------oooo--------